मधुवार्ता

# मधमाशी पालन व्यवसायातून व्यापक रोजगार निर्मिती



**बिपीन जगताप**
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मध उद्योग),
महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ.

मधमाशी पालन हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त उद्योग आहे. भविष्यातील मधाची वाढती मागणी आणि शेती- पीक उत्पादनात होणारी मोठी वाढ पाहता, या उद्योगातून मोठी आर्थिक कमाई आणि मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीस वाव आहे.

राज्याची भौगोलिक परिस्थिती पाहता, राज्यात किमान अडीच लाख मधमाश्यांच्या वसाहती (पेट्या) राहतील आणि यातून लाखो टन मधनिर्मिती होऊ शकेल, असा अनेक तज्ज्ञांचा अंदाज आहे. सद्य:स्थितीत केवळ काही हजार मधपेट्या राज्यात आहेत आणि या पाळीव वसाहतींतून दीड लाख किलो एवढे मध उत्पादन होत आहे.

राज्याला पश्चिम घाटाचे- सह्याद्री पर्वताचे मोठे क्षेत्र लाभले आहे. जवळपास १२ जिल्हे आणि ६३ तालुक्यांचा समावेश यांमध्ये होतो. उत्तम पर्यावरण, जंगल आणि मधमाश्यांना उपयुक्त असणारा फुलोरा पश्चिम घाटात मुबलक आहे. या भागात कोल्हापूरमधील पाटगाव, आजरा, भुदरगड तसेच सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर, पाटण, जावळी, वाई या तालुक्यांत आजही अनेक लोक मधमाशी पालन या व्यवसायावर अवलंबून आहेत. जगात मधमाशी पालनाला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन देण्यात येत आहे. शेती पीक उत्पादनात प्रचंड



वाढ करण्याची क्षमता मधमाश्यांमध्ये आहे. शेतकऱ्यांना जास्तीची आर्थिक मिळकत देणारा हा उद्योग आता लोकप्रिय होत आहे.

जगभर मोठ्या प्रमाणात लोकांची जीवनशैली बदलत आहे. जग आयुर्वेदाकडे पुन्हा एकदा झपाट्याने



वाटचाल करीत आहे. बेरोजगार तरुणांचा, महिलांच्या रोजगाराचा मोठा प्रश्न उभा राहत असताना; शेती व शेतीपूरक उद्योग व्यवसायांना तांत्रिक व यांत्रिक जोड देत, शेतीची उत्पादन क्षमता वाढविणे ही काळाची गरज झाली आहे.

दुग्ध उत्पादन, मधमाशी पालन, कुक्कुट पालन, वराह पालन, रेशीम उद्योग इत्यादी अनेक उद्योग शेतीपूरक आहेतच. मात्र ते मुख्य उद्योग म्हणून करण्यासाठी शेतकऱ्यांनी तसेच बेरोजगारांनी तयारी दर्शवली पाहिजे. या सगळ्यात मधमाशी पालन हा भविष्याच्या दृष्टीने खूप मोठा व फायदेशीर दिलासा देणारा उद्योग ठरेल.



आरोग्याच्या बाबतीत अतिशय संवेदनशील झालेले लोक भविष्यात मोठ्या प्रमाणात मधाचे सेवन करणार आहेत. मधाचे विक्रमी उत्पादन वाढविण्यासाठी तरुण–प्रयोगशील शेतकऱ्यांनी पुढे येणे आवश्यक आहे. मधमाश्या केवळ मध व मेण एवढेच उत्पादन देत नाहीत तर शेतकऱ्यांचे ३५ ते ४०% एवढे पीक उत्पादन देखील वाढवितात.



जगात मधाला प्रचंड मागणी असल्याने निर्यातीलाही मोठा वाव आहे. मधमाश्यांमुळे निसर्गाचा समतोल राखला जातो. मधमाश्यांचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी जागतिक स्तरावर २० मे हा दिवस 'जागतिक मधमाशी दिन' म्हणून साजरा केला जात असतो. तो यंदाही विविध उपक्रमांनी साजरा झाला.

मधमाश्यांच्या संवर्धनासाठी आज आपण पुढे येऊया. शेतकरी, बेरोजगार तरुण व महिलांसाठी हा नमुनेदार उद्योग खूप फायद्याचा ठरणार आहे. राज्य शासन मधमाशी पालनासाठी पन्नास टक्के अनुदान देत असतानाच प्रशिक्षणही मोफत देत आहे. मध खरेदीची हमीही देत आहे. यातच आता केंद्र शासनाने या उद्योगास हातभार लावला आहे. याचा फायदा घेऊन आपणही मधउद्योजक व्हावे. 'मधाचे गाव' ही नवी संकल्पना राज्यात खादी व ग्रामोद्योग मंडळ राबवीत आहे. मंडळाचे सभापती श्री. रवींद्र साठे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती अंशू सिन्हा यांच्या संकल्पनेतून राज्यातील डोंगराळ व जंगली भागातील गावांची निवड मधाचे गाव म्हणून करण्यात येत आहे. मधुपर्यटन आणि मधमाशी संवर्धन हे उद्देश ठेवून सुरु झालेली ही लोकचळवळ अनेक गावांत पोहचली आहे. मांघर (महाबळेश्वर) या मधाच्या गावाच्या शुभारंभाला आता एक वर्ष पूर्ण झाले. या एक वर्षात मधमाश्या पाहण्यासाठी आणि शुद्ध मध घेण्यासाठी जवळपास एक लाख लोकांनी गावाला भेटी दिल्या. गावातील महिला बचत गटांना रोजगार मिळाला. मधमाशी पर्यटनाला चांगली संधी निर्माण झाली. गावातील शेती सेंद्रिय शेती झाली आहे. गावाचे आर्थिक उत्पन्न वाढून अनेक लोकांनी मधमाशीचे संवर्धन करून कायमचा रोजगार मिळवला आहे. नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यामधले 'बसवंत मधमाशी उद्यान व प्रशिक्षण केंद्र' देखील या क्षेत्रात प्रशिक्षण, प्रसार व मधुपर्यटन अशा तीनही स्तरांवर वैशिष्ट्यपूर्ण काम करीत आहे.

'मधाचे गाव' या संकल्पनेला राज्य शासनाने देखील बळ दिले असून, यावर्षीच्या अर्थसंकल्पात मधाच्या गावाला भरघोस निधी दिला आहे. त्यामुळे 'मधाचे गाव' हे मॉडेल मधमाशी संर्वधनासाठी मोठ्या प्रमाणावर फायदेशीर ठरेल.



■